॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

**✻ सुविचार ✻**

जग बदलायचे असेल तर
आधी स्वतःला बदलवा.

**वीरभूमी फोडणी**

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

**दिवा**

नव्या आकांक्षा नवी स्वप्ने
चला लावूया एक दिवा
अंधाराच्या वाटेवरती पुन्हा
प्रकाशाचा किरण हवा

मंगल विचारांनी उजळती
जीवनाच्या दाही दिशा
मने जोडणाऱ्या जादूची
सगळ्यांना समजू दे भाषा

# संपामुळे जिल्ह्यातील बँकिंग कामकाज ठप्प

## नगरमध्ये फेडरल बँकेसमोर जोरदार निदर्शने । 'पाच दिवसांचा आठवडा'सह विविध मागण्यांसाठी आंदोलन

**अहिल्यानगर । वीरभूमी –** पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करावा, कामगिरीशी निगडित प्रोत्साहनपर भत्त्यातील भेदभाव दूर करावा तसेच द्विपक्षीय करारातील तरतुदींची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर) युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या वतीने देशव्यापी बँक संप पुकारण्यात आला. या संपाला अहिल्यानगर जिल्ह्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सावेडी येथील नगर-मनमाड महामार्गावरील फेडरल बँकेसमोर बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जोरदार निदर्शने करीत आपल्या मागण्यांकडे सरकार व बँक व्यवस्थापनाचे लक्ष वेधले. संपामुळे जिल्ह्यातील बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणात ठप्प झाल्या.



या आंदोलनात संघटनेचे कॉ. प्रकाश कोटा, कॉ. कांतिलाल वर्मा, कॉ.सुजय नळे, कॉ. चेतन बुरा, कॉ. सुमिता सोळंके, कॉ. स्वीटी कुमारी, स्मिता निंबळकर, प्रीती दहीवाल, सुजय नळे, संदीप सारोवारे, सूरज गाडे, सागर तनपुरे, मयूर जामगावकर, राजेंद्र जांबे,गणेश पांडार, समीर दंडगावले, प्रशांत गोरे, संदीप काळे, सचिन शिरसाठ, अमोल चव्हाण, अमोल चव्हाण, विजय मुस्माळे, सचिन टेंगळे, अस्मिता अडसूरे, सचिन शिरसाठ, प्रशांत गोरे, उषा सपणार, समीर धडघावले, विजय मुस्माडे, प्रतिक्षा गवळी, राजेंद्र बेरड, कॉ. शिवाजी पळसकर आदी बँक अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

हा संप केवळ पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याच्या मागणीपुरता मर्यादित नसून, द्विपक्षीय कराराची विश्वासार्हता, सामूहिक सौदेबाजीचा अधिकार आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संघटित चळवळीच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. मान्य झालेल्या करारातील तरतुदींची अंमलबजावणी अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवली जात असेल, तर व्यवस्थापनाशी झालेल्या वाटाघाटींच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते, अशी भूमिका संघटनांनी मांडली.

पाच दिवसांचा आठवडा लागू झाल्यास कर्मचाऱ्यांचे कामाचे तास कमी होतील, असा केला जाणारा प्रचार दिशाभूल करणारा असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. प्रस्तावित व्यवस्थेनुसार सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांच्या कालावधीत दररोज सुमारे ४० मिनिटे अतिरिक्त कामकाज करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या एकूण कामाच्या वेळेत कपात होणार नसून, कामाच्या वेळेची केवळ पुनर्रचना होणार असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

दिवसअखेरचा ताळमेळ, कर्जवसुली, सरकारी योजनांची अंमलबजावणी, लेखापरीक्षण, अनुपालन, डिजिटल व्यवहारांशी संबंधित तक्रारी, प्रशासकीय कामकाज आदी जबाबदाऱ्यांमुळे बँक कर्मचारी अनेकदा नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा अधिक काळ काम करतात. अनेक शाखांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताणही वाढत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

रिझर्व्ह बँक, विमा क्षेत्रासह वित्तीय क्षेत्रातील अनेक संस्थांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. दुसरीकडे यूपीआय, एटीएम, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, कॅश डिपॉझिट मशीन आणि बिझनेस करस्पॉन्डंट यांसारख्या सुविधांमुळे ग्राहकांना अनेक बँकिंग सेवा सातही दिवस उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकसेवेचे कारण पुढे करून पाच दिवसांच्या आठवड्याला विरोध करणे विसंगत असल्याचा दावा बँक संघटनांनी केला. ग्राहकसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या कामाच्या दिवसांपेक्षा पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ, सक्षम डिजिटल यंत्रणा, प्रभावी तक्रार निवारण व्यवस्था आणि रिक्त पदांची भरती याकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे संघटनांनी सांगितले.

बँक शाखांमधील कर्मचारी कमतरता दूर करण्याऐवजी कंत्राटी पद्धतीने व आउटसोर्सिंगच्या माध्यमातून कामकाज वाढविण्यावर भर देणे योग्य नसल्याची भूमिकाही संघटनांनी मांडली. ग्राहकांना चांगली सेवा देण्यासाठी प्रशिक्षित व पुरेसे नियमित मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. वाढत्या डिजिटल व्यवहारांसोबतच ग्राहकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शाखास्तरावर सक्षम कर्मचारी असणे गरजेचे असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

प्रास्ताविक कॉ.सुजय नळे यांनी या आंदोलनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. ११ सप्टेंबरचा संप हा संघर्षाची सुरुवात असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. मागण्या मान्य न झाल्यास २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी तीन दिवसांचा देशव्यापी संप करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला. त्यानंतरही सरकार व संबंधित यंत्रणांनी मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ऑक्टोबर महिन्यात बँक कर्मचारी बेमुदत संपाच्या दिशेने जाणार असल्याचे संघटनांनी जाहीर केले. या आंदोलनाचे सूत्रसंचालन कॉ. प्रकाश कोटा यांनी केले. आभार कांतिलाल वर्मा यांनी मानले.

# स्वस्त धान्यासाठी 'ई-केवायसी'ची सक्ती

**मुंबई । वीरभूमी –** पुरवठा विभागाने शिधापत्रिकेसाठी ई-केवायसी आता सक्तीची केली आहे. शिधापत्रिकेत नाव असलेल्या प्रत्येक सदस्यांना ई-केवायसी करावी लागेल. त्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली. या मुदतीत शिधापत्रिकेची ई-केवायसी न केल्यास स्वस्त धान्य बंद केले जाणार असल्याचे पुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सर्व पात्र शिधाधारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत बंधनकारक केले आहे. आगामी ३० सप्टेंबरपर्यंत शिधापत्रिकामधील सर्व सदस्यांनी 'ई-केवायसी' पूर्ण न केल्यास, संबंधित लाभार्थ्यांना धान्य मिळणे कायमचे बंद होणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पारदर्शक धोरणानुसार, स्वस्त धान्याचा लाभ केवळ प्रत्यक्ष गरजू व पात्र नागरिकांपर्यंतच पोहोचावा, तसेच वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी 'ई-केवायसी' सक्तीचे करण्यात आले आहे असे जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी सांगितले.

'ई-केवायसी' करण्यासाठी नागरिकांनी आपल्या गावातील किंवा परिसरातील जवळच्या अधिकृत स्वस्त धान्य दुकानाला प्रत्यक्ष भेट द्यावी लागेल. ई-पॉस मशीनवर आपल्या बोटांचे ठसे अद्ययावत करून ही प्रक्रिया विनामूल्य पूर्ण केली जाणार आहे. शिधापत्रिकामधील प्रत्येक सदस्याची वैयक्तिक ई-केवायसी होणे अनिवार्य केले. 'ई-केवायसी' न करणाऱ्या लाभार्थ्यांना धान्याची गरज नाही, असे गृहीत धरून त्यांचे धान्य थांबवले जाईल. मुदतीपूर्वी 'ई-केवायसी' पूर्ण करून स्वस्त धान्य मिळण्याचा मार्ग सुरक्षित करणे गरजेचे असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई । वीरभूमी –** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होणार असून, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागांत पावसाची तीव्रता कायम राहणार असून, रविवारी उत्तर महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणात १२ ते १६ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात १२ आणि १३ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात १२ सप्टेंबर रोजी काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता असून, विदर्भात १२ सप्टेंबर रोजी मुसळधार, तर १३ आणि १४ सप्टेंबर रोजी मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

दरम्यान, कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पावसाचे पुनरागमन झाल्याने राज्यातील अनेक भागांत ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे स्थानिक पातळीवर पाणी साचण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## SPOT NEWS

### भारताकडे १९० अण्वस्त्रे; मोठा प्लुटोनियम साठा

**नवी दिल्ली –** क्षेपणास्त्रांसाठी राखून ठेवली आहेत. हिंदुस्थानकडे समृद्ध प्लुटोनियमदेखील असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. जगभरात नऊ देशांकडे एकूण १२,१८७ अण्वस्त्रे असल्याचे अहवालात नमूद आहे. रशिया आणि अमेरिकेकडे पाच हजारांपेक्षा जास्त अण्वस्त्रे आहेत. भारताकडून सातत्याने आण्विक क्षमतेचा विस्तार आणि आधुनिकीकरण करण्यात येत आहे. गेल्या सहा वर्षांमध्ये भारताने ४० अण्वस्त्रे बनविली आहेत. त्यापैकी दहा अण्वस्त्रे याच वर्षी तयार करण्यात आली आहे. अहवालानुसार, भारताकडे या वर्षीच्या सुरुवातीला ७३० किलो प्लुटोनियम होते. त्यातून २२५ अण्वस्त्रे बनविता येऊ शकतात. हा केवळ अंदाज असून प्रत्यक्ष संख्या जास्त असू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

### सरकारकडून ओबीसींची फसवणूक : नाना पटोले

**मुंबई –** काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांची राजभवनावर भेट घेतली. या भेटीत राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. जातनिहाय जनगणना, ओबीसी समाजाचे प्रश्न, एमपीएससी पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांचे आंदोलन, शेतक-यांची आत्महत्या आदी प्रश्न उपस्थित केले. केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप करताना नाना पटोले म्हणाले की देशामध्ये ४,२०० पेक्षा जास्त ओबीसी जाती आहेत. सरकारने आणि स्वतः पंतप्रधान मोदींनी देशात जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पाळले जात नाही. उलट, ओबीसींची मोठी फसवणूक केली जात आहे.

# एमपीएससीच्या सचिवाच्या तोंडाला काळे फासले; अध्यक्षांचाही नंबर लागणार

## संभाजी ब्रिगेडचा सरकारला थेट इशारा । भ्रष्ट व्यवस्थेचा केला निषेध

**अहिल्यानगर । वीरभूमी –** एमपीएससी औषध निरीक्षक पेपर फुटी प्रकरणी राज्य सरकारने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने अखेर संभाजी ब्रिगेडने आक्रमक पवित्रा घेतला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी काळे फासत या भ्रष्ट व्यवस्थेचा जाहीर निषेध केला आहे. ही कारवाई संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे आणि योगेश पाटील यांनी केली आहे.

याप्रकरणी संभाजी ब्रिगेडने इशारा दिला होता ३ ऑगस्ट रोजी एमपीएससी पेपर फुटी प्रकरणी संभाजी ब्रिगेडने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन केले होते. त्याचवेळी प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी इशारा दिला होता की, सरकारने कारवाई नाही केली तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. सरकारने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याने आजची प्रतिक्रिया उमटली आहे.

याबाबत माहिती देताना अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे म्हणाले, हा हल्ला कोणत्याही व्यक्तीवर नाही, तर या सडलेल्या व्यवस्थेवर आहे. काळे फासणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे, योगेश पाटील यांच्या पाठीशी संभाजी ब्रिगेड ठामपणे उभी असल्याचे राजेश परकाळे यांनी सांगितले.

या घटनेनंतर प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. चझडउ चा अभ्यास करणाऱ्या २५ लाख विद्यार्थ्यांच्या आणि महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या आणि नालायक सरकारच्या तोंडाला काळे फासले आहे. महेंद्र हरपाळकरच्या थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे. सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे, त्यांना ज्या भाषेत समजते त्या भाषेत सांगितले पाहिजे.

एमपीएससी चे अध्यक्ष व सचिव यांनी तत्काळ राजीनामा दिला नाही, तर पुढचा नंबर हा एमपीएससी अध्यक्षांचा असेल यात तिळमात्र शंका नाही, असा थेट इशारा आखरे यांनी दिला आहे.



यापूर्वी आपल्या आवाहनात ॲड. आखरे म्हणाले होते की, आज प्रश्न फक्त एका पेपरफुटीचा नाही, प्रश्न आहे शिक्षणाच्या विश्वासार्हतेचा, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, संविधानाने दिलेल्या समान संधीच्या अधिकाराचा.

तर संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य दिले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा प्रकाश दिला. आता त्या प्रकाशाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड नाही! शिक्षणावर अन्याय सहन नाही. दरम्यान आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# SPOT NEWS

## संत निरंकारी मिशनच्या वतीने रविवारी इंग्लिश माध्यम सत्संग सोहळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



निरंकारी सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमित जी यांच्या कृपाशीर्वादाने निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने युवावर्गासाठी झोनस्तरीय इंग्लिश मिडीयम समागम निमित्त विशाल सत्संग सोहळ्याचे आयोजन केले असून रविवार (दि.१३) रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत संजोग लॉन्स, नगर–मनमाड रोड येथे मोठ्या उत्साहात कार्यक्रम होईल यात नगर शहर व जिल्हा तसेच अहिल्यानगर झोन अंतर्गत येणाऱ्या शाखांपैकी बीड, परभणी, हिंगोली, नांदेड या पाच जिल्ह्यातील युवा संत व साधसंगत चे भाविक सहभागी होणार असल्याची माहिती झोन ३६– चे झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की,जगातील ६० हून अधिक देशात पोहोचलेली संत निरंकारी मिशनची विचारधारा इंग्रजी या जागतिक भाषेमार्फत अधिक व्यापक स्वरूपात युवकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या कार्यक्रमाचा असून इंग्लिश भाषेत गीत, विचार, मनोगते, कविता, नाटिका आदींच्या माध्यमातून सदगुरुंची पावन शिकवण तसेच मिशनच्या दैवी मूल्यांचा संदेश या कार्यक्रमाद्वारे दिला जाणार असल्याचे खुबचंदानी शेवटी म्हणाले. तरी सदर आध्यात्मिक इंग्लिश माध्यमाच्या सत्संग कार्यक्रमास युवावर्गाने तसेच भाविकांनी उपस्थित रहावे अशी विनंती निरंकारी मिशनच्या वतीने करण्यात आली आहे.

## लक्ष्मीबाई तारु यांचे निधन


**● शेवगाव । वीरभूमी–**



शहरातील माळी गल्ली भागातील जेष्ठ महिला नागरिक लक्ष्मीबाई गजानन तारु वय ७२ यांचे नुकतेच निधन झाले. त्याच्या पश्चात पती, दोन मुले सुना, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. व्यावसायिक संजय तारु यांच्या त्या आई होत.

## कुसुमताई काकडे यांचे निधन

**● शेवगाव । वीरभूमी–**



शेवगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ स्व. ॲड. विजयराव काकडे यांच्या पत्नी कुसुमताई विजयराव काकडे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. कुसुमताई काकडे यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयातील ॲड. युवराज काकडे, शेवगाव न्यायालयातील ॲड. अभिजित काकडे तसेच डॉ. सुनीता आवारी यांच्या त्या मातोश्री होत. कुसुमताई काकडे यांच्या पार्थिवावर शेवगाव येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. कुसुमताई काकडे यांच्या निधनाने काकडे परिवारासह शेवगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणार नाही याची दक्षता घ्या; दावे–हरकतींची काटेकोर छाननी करा

### विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम । मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व नागरिकस्नेही करण्यावर भर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

मतदार यादी सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया अधिक गतिमान करताना प्रत्येक मतदाराची नोंद अचूकपणे तपासून मतदार यादी अद्ययावत, पारदर्शक व विश्वासार्ह करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत चुकीने वगळले जाणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी. प्राप्त दावे व हरकतींची नियमानुसार वस्तुनिष्ठ व काटेकोर छाननी करून संपूर्ण प्रक्रिया निष्पक्ष आणि नागरिकाभिमुख पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांनी आज दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयात विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली मतदार यादी पुनरीक्षणाचा आढावा तसेच सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे, विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, पदाधिकारी व प्रतिनिधी तसेच संबंधित मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामात प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या बीएलओंची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे बीएलओंकडून सुरू असलेल्या कामाचा नियमित आढावा घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शन व सूचना द्याव्यात. प्रत्येक मतदाराची नोंद काळजीपूर्वक तपासताना संबंधित कागदपत्रे, उपलब्ध माहिती आणि प्रत्यक्ष पडताळणी यांचा योग्य समन्वय साधावा.

मतदार यादीत एकाच व्यक्तीची एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंद असणे, मतदाराचे स्थलांतर होणे, मृत्यू झालेला असणे किंवा अन्य कारणांमुळे नोंदीमध्ये बदल आवश्यक असल्यास तसेच प्राप्त होणा–या दावे व हरकतींची योग्य पध्दतीने तपासणी करुन अंतिम निर्णय घ्यावा.

आगामी काळात मतदान केंद्रांची रचना करताना मतदारांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. मतदान केंद्राचे स्थान, मतदारांची संख्या, प्रवेशाची सुलभता तसेच उपलब्ध मूलभूत सुविधा यांचा विचार करून मतदारस्नेही मतदान केंद्रांची रचना करावी. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार आणि इतर गरजू मतदारांना मतदान करताना आवश्यक सुविधा उपलब्ध होतील, याकडेही लक्ष द्यावे, असे डॉ. गेडाम यांनी सांगितले.

मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, वय तसेच अन्य तपशील अचूक आहेत का, याची नागरिकांनी स्वतःही खात्री करावी. नोंदीमध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधून नियमानुसार दुरुस्तीची कार्यवाही करून घ्यावी. मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया ही निरंतर स्वरूपाची असल्याने पात्र नागरिकांना नोंदणी, दुरुस्ती अथवा आवश्यक बदल करण्याची संधी उपलब्ध आहे.

मतदार यादी ही लोकशाही व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचा हक्क सुरक्षित राहील आणि प्रत्येक नोंद अचूक राहील, यासाठी प्रशासन, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे, असे आवाहनही विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची सद्यस्थिती, प्राप्त अर्ज, नोंदींची पडताळणी आणि आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली. बैठकीत उपस्थित विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींनी मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मौलिक सूचना मांडल्या. प्रशासनाने या सूचनांची नोंद घेत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## गणेशोत्सवात ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी डीजेला लगाम घालण्याची काते यांची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा सार्वजनिक गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा उत्सव आहे. मात्र गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या आवाजातील डीजे व कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालावा आणि पारंपरिक ढोल–ताशा व ढोल पथकांना शासनाच्या नियमानुसार परवानगी द्यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव शंकरराव काते यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

गणेशोत्सवाच्या काळात वाढणाऱ्या ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान कर्णकर्कश आवाजातील डीजे व ध्वनीप्रदूषण करणाऱ्या साउंड सिस्टिमला परवानगी देऊ नये, अशी मागणी काते यांनी निवेदनातून केली आहे.

शासन व न्यायालयाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा तसेच ध्वनिक्षेपक वापराच्या वेळेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळे अथवा संबंधितांवर नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

डीजेवरील निर्बंधांचा उद्देश गणेशोत्सवातील आनंद किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांना विरोध करणे नसून कर्णकर्कश ध्वनीप्रदूषणाला आळा घालणे हा आहे. त्यामुळे गणेशोत्सवातील पारंपरिक सांस्कृतिक परंपरांना प्रोत्साहन देत ढोल–ताशा, ढोल पथक, लेझीम, भजन–कीर्तन तसेच आवश्यकतेनुसार ध्वनिक्षेपकांना निर्धारित ध्वनीमर्यादा व वेळेच्या अधीन राहून परवानगी द्यावी, अशी मागणी काते यांनी केली.

## देवीभोयरेत अंबिका माता मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

### शनिवारपासून दोन दिवस धार्मिक कार्यक्रम । हजारो भाविकांच्या उपस्थितीत होणार प्रतिष्ठापना

**● निघोज । वीरभूमी –**

राज्यातील जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवीभोयरे येथील श्री अंबिका माता मंदिरातील नवीन मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा शनिवार, दि. १२ व रविवार, दि. १३ रोजी उत्साहात होणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून हजारो भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.



अंबिका मातेची मूर्ती पुरातन असल्याने ग्रामस्थ तसेच राज्यातील भाविकांनी नवीन मूर्ती तयार करण्याची मागणी केली होती. त्यानुसार अंबिका देवस्थान ट्रस्टने देणगीचे आवाहन केले. त्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून लोकसहभागातून सुमारे ५५ लाख रुपयांहून अधिक निधी जमा झाला. या निधीतून नवीन मूर्ती, सिंहासन तसेच दागिन्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

शनिवार, दि. १२ रोजी सकाळी नवीन मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यात लेझीम, झांज पथक व भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. दुपारी पुरोहित सच्चिदानंद गाडगीळ गुरुजी तसेच अहिल्यानगर येथील पुरोहितांच्या हस्ते विविध पूजाविधी होणार आहेत.

रविवार, दि. १३ रोजी सकाळी ७ वाजता पर्याय होम, पुण्याहवाचन, प्राणप्रतिष्ठा होम, पूर्णाहुती व प्रायश्चित्त होम आदी धार्मिक विधींना सुरुवात होईल. सकाळी ९ ते ११ या वेळेत विकासानंदजी महाराज मिसाळ यांची देवी महात्म्य कीर्तन सेवा होणार आहे. त्यानंतर सकाळी ११.११ वाजता मिसाळ महाराज यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. धार्मिक विधींच्या पूर्णाहुतीनंतर भाविक तसेच अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील ग्रामस्थांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, अंबिका देवस्थानला राज्य शासनाने नुकताच 'ब' दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिली आहे. मंदिर परिसरातील उपलब्ध एक एकर जागेत भाविकांसाठी पाच मजली भक्तनिवास उभारण्यात येणार असून, त्यासाठी लवकरच पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती देण्यात आली. तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मंदिर परिसरात विविध विकासकामेही प्रस्तावित आहेत.

अंबिका मातेचे भक्त संपूर्ण महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतही असून, वर्षभर भाविक दर्शनासाठी येत असतात. नवरात्रोत्सवात दहा ते बारा दिवस लाखो भाविक उपस्थित राहतात.

नवीन मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अंबिका देवस्थान ट्रस्ट, समस्त ग्रामस्थ, देवीभोयरे व मुंबईकर मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संपत्तीपेक्षा संतती महत्त्वाची मुलींसोबत मुलांच्या मनाचीही काळजी घ्या!

**आज आपण सर्व मातापिता आपल्या मुलींच्या सुरक्षिततेसाठी खूप जागरूक असतो. मुलगी बाहेर शिक्षणासाठी गेलेली असेल, तर एक जागरूक पालक या नात्याने आपण वेळोवेळी तिची विचारपूस करतो, तिच्याकडून अपडेट्स घेतो आणि ते घ्यायलाच हवेत. आपण आपल्या अवतीभवती पाहतो की, महिला आणि मुलींच्या बाबतीत पावलोपावली अनेक चुकीच्या घटना घडत आहेत.**

पण आपण मुलींच्या बाबतीत जेवढे सतर्क असतो, तेवढेच आपल्या मुलांच्या बाबतीत वागतो का? पालकांनो, आपला मुलगा एकटा पडला आहे का? तो मानसिक तणावातून जात आहे का? किशोरवयातून जाताना तो कोणत्या ताणतणावामध्ये जगतोय का? याची खात्री करा. त्याला भरमसाठ पैसा पुरवला म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे म्हणणे पूर्णतः चुकीचे आहे. आई आणि बाबा, तुम्ही दोघेही तुमच्या मुलाचे नेहमी बेस्ट फ्रेंड बना. त्याच्यासोबत विश्वासाचे नाते निर्माण करा. त्याला मनमोकळेपणाने बोलण्यासाठी बाहेरच्या मित्रांचीच गरज पडणार नाही, इतके विश्वासाचे नाते तुम्हीच त्याच्यासोबत निर्माण करा. त्याच्या मनात आतल्या आत कोंडलेले विचार आणि भावना मोकळ्या करण्यास मदत करा.

अनेक मुले बाहेर शिक्षण घेताना मानसिक तणावात जगताना दिसून येतात. घरच्यांकडे वारंवार पैसे मागायला अनेक मुलांना अपराध्यासारखे वाटते. कधी कधी आर्थिक अडचणी असूनही ही मुले त्या गोष्टी घरच्यांना सांगत नाहीत. आई–बाबांनी विचारले, बाळा, जेवलास का रे? तर हो म्हणतात; कारण आई–बाबांना वाईट वाटू नये, अशी त्यांची भावना असते.

पालकांच्या देखील काही गोष्टी कधीच लक्षात येत नाहीत. त्यांना वाटते, 'सगळे ठीक आहे, ऑल इज वेल'; पण प्रत्यक्षात परिस्थिती तशी नसू शकते. आपण पाहतो, काहींच्या घरी सर्व काही चांगले असतानाही मुले गंभीर मानसिक तणावातून जातात. काही मुले परिस्थितीला वैतागून चुकीचे टोकाचे निर्णय घेण्याच्या विचारांपर्यंत पोहोचतात. कारण ते कुठल्या ना कुठल्या तणावामध्ये जगत असतात.

आई–बाबा शिक्षणासाठी पैसे पुरवत असतात. त्यामुळे घरच्यांवर आधीच आर्थिक ताण असतो. मग आपल्या अडचणी कशाला घरी सांगायच्या, असा प्रश्न मुलांच्या मनात घुटमळत असतो. आणि मग ही मुले एकटीच आतल्या आत घुसमटत राहतात. परिस्थिती असह्य वाटू लागली की त्यांना योग्य आधार, संवाद आणि मदत मिळणे अत्यंत गरजेचे असते.

मुलांचा अवघड असलेला अभ्यास, एखाद्या नात्यात आलेले अपयश, मैत्रीतील समस्या, करिअरची चिंता किंवा भविष्याबद्दलची भीती– यामुळे मुले मानसिक तणावात जाऊ शकतात. पण यापैकी बऱ्याच गोष्टी ते घरी काहीच सांगत नाहीत. या तणावाची लढाई ते एकटेच लढत राहतात.

बाळांनो, तुमच्या जीवनात कितीही बिकट वेळ आली, तरी कृपया स्वतःला इजा करण्याचा किंवा जीवन संपवण्याचा विचार करू नका. कितीही कठीण परिस्थिती असली तरी ती कोणासोबत तरी बोलून मोकळी करा. आई–बाबांशी बोला, विश्वासू व्यक्तीशी बोला आणि गरज वाटल्यास तज्ज्ञांची मदत घ्या. परिस्थिती बदलू शकते; पण त्यासाठी तुम्ही स्वतःची काळजी घेणे आणि मदत स्वीकारणे महत्त्वाचे आहे.



वीरभूमी
**सौ. आशा सुधीर साठे**
सैनिकपत्नी, अहिल्यानगर
९६०४०५६९२८

तुमचे आई–बाबा तुमच्यासाठी संघर्ष करत, परिस्थितीशी लढत तुम्हाला मोठे करत आले आहेत. त्यामुळे तुमच्या मनात कितीही मोठे वादळ असले तरी ते त्यांच्यासोबत शेअर करा. तुम्ही एकटे नाही, हे स्वतःला सतत आठवण करून द्या. परिस्थितीशी लढायला शिका. तुमचे जे ध्येय होते ते जरी पूर्ण झाले नाही, तरी हताश होऊ नका. दुसरा मार्ग शोधा, नवे ध्येय ठरवा; पण स्वतःला संपवण्याचा विचार मनातही आणू नका, रे बाळांनो!

आई–बाबा, आजच्या तरुणाईला समजून घ्या. आपल्यासारखी सहनशीलता त्यांच्या अंगी असेलच असे नाही. त्यामुळे त्यांना सतत फाडफाड बोलत जाऊ नका. त्यांना समजून घ्या. त्यांचे म्हणणे शांतपणे ऐका.

एखाद्या क्षेत्रात यश मिळाले नाही, तर आपण दुसरे काहीतरी करू, पुन्हा प्रयत्न करू, अशी ग्वाही त्याला द्या. त्याचा विश्वास जिंका. आई–बाबा, तुम्ही मुलांचे जिवलग मित्र–मैत्रिणी बनून राहा. मनमोकळेपणाने कोणत्याही विषयावर त्यांच्याशी गप्पा मारा. असे केल्यास आपले मूल स्वतःला एकटे समजणार नाही.

आई–बाबा मुलांचे बेस्ट फ्रेंड बनून राहिले आणि मुलांसोबत कोणत्याही विषयावर मनमोकळ्या गप्पा मारल्या, तर मुलांना मन मोकळे करण्यासाठी चुकीच्या संगतीचा आधार घेण्याची शक्यता कमी होईल. सगळेच मित्र जिवलग किंवा चांगले असतात असे नक्कीच नाही. त्यामुळे आई–बाबांनी मुलींसारखेच मुलांच्या चांगल्या भविष्याकडेही तितकेच लक्ष देणे आज खूप गरजेचे आहे. संपत्तीपेक्षा संतती खूप महत्त्वाची आहे, हे लक्षात ठेवा. आणि हो, मुलांनो, तुम्हीदेखील आई–बाबांप्रती कसे वागावे, याचा विचार करा.

आई–बाबांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलांना मोठे करण्यात, त्यांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी संघर्ष करण्यात घालवलेले असते. आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांवरही अनेक जबाबदाऱ्या आणि ताणतणाव आहेत, हे आई–बाबांना समजून घ्यायला हवे; पण त्याच वेळी मुलांनीही आपल्या आई–बाबांसाठी थोडा वेळ राखून ठेवायला हवा.

उच्चशिक्षित होऊन चांगले करिअर करताना आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. कामाचा ताण, घरच्या जबाबदाऱ्या आणि धावपळीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण तुमच्यावर तुमचा परिवार अवलंबून असतो.

तुम्हाला लहानाचे मोठे करताना आई–बाबांच्या मनात तुमच्या असंख्य आठवणी साठलेल्या असतात. तुम्ही जिथे असाल तिथे सुखी राहा, अशीच त्यांची मनापासून इच्छा असते; पण तुमच्या आठवणीने त्यांच्या डोळ्यांत पाणीही येते.

म्हणूनच बाळांनो, तुमच्या जबाबदाऱ्या आणि तुमचा परिवार यामध्ये जगताना स्वतःसाठीही थोडा वेळ काढा. आनंदी राहा, निरोगी राहा आणि आई–बाबांशी नाते जपा. कारण आयुष्याच्या शेवटपर्यंत आई–बाबांचा जीव तुमच्यातच गुंतलेला असतो.

मुलांना केवळ सुख–सुविधा देऊ नका; त्यांना वेळ द्या, संवाद द्या, विश्वास द्या आणि प्रेम द्या. आणि मुलांनो, आई–बाबांना केवळ यशाची बातमी देऊ नका; तुमच्या मनातलेही त्यांच्यासोबत शेअर करा. कारण कुटुंबातील मनमोकळा संवाद हीच अनेक समस्यांवरची पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे.

# टंचाई सदृष्य परिस्थिती निवारणासाठी गावनिहाय सूक्ष्म नियोजन करा

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । पाणीपुरवठा, चारा उपलब्धता आणि पीक नियोजनावर प्रशासनाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश

**● अहिल्यानगर । वीरभूमी-** यंदा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने संभाव्य टंचाई सदृष्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलता आणि तत्परतेने काम करावे. गावनिहाय पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करून नागरिकांना पिण्याचे पाणी नियमितपणे उपलब्ध होईल, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज दिले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील टंचाई सदृष्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली.

या बैठकीस आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. दशरथ दिघे, जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हाधिकारी वर्षा पवार, वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल यांच्यासह सर्व विभागाचे विभागप्रमुख तसेच तालुकास्तरीय अधिकारी या आढावा बैठकीस दूरदृश्यप्रणाली द्वारेउपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील पाणीपुरवठा, टँकरद्वारे पाणी वितरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना, पाण्याचे स्थानिक स्रोत, चारा उपलब्धता, पशुधन आणि आगामी पीक नियोजनाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

**गावनिहाय पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन**

गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींशी सल्लामसलत करून गावनिहाय पाणी वाटपाचे नियोजन करावे. पाण्याची उपलब्धता, लोकसंख्या आणि संभाव्य गरज लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना वेळेत कराव्यात. टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी निर्माण होणार नाहीत, यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या गावांमध्ये नागरिकांना टँकर कधी येणार याची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी पद्धारे टँकरचे वेळापत्रक निश्चित करावे. यामुळे पाणी वितरणामध्ये सुसूत्रता आणि पारदर्शकता येण्यासोबतच नागरिकांचीही मोठी सोय होणार आहे.

**प्रलंबित पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यावर भर**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक कामे तातडीने पूर्ण करावीत. पाणीपट्टी थकीत असल्यास ती भरण्यासाठी तसेच वीज देयक थकीत असल्यास त्याची पूर्तता करून बंद असलेल्या योजना पुन्हा सुरू करता येतील का, याचा स्थानिक पातळीवर आढावा घ्यावा. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून जास्तीत जास्त गावांना पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

**स्थानिक जलस्रोतांचा प्रभावी वापर**

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. गावांच्या जवळील उपलब्ध पाण्याचे स्रोत तपासून त्यांचा पाणीपुरवठ्यासाठी प्रभावी वापर करण्यावर भर द्यावा. आवश्यकता भासल्यास विहीर तसेच तलाव अधिग्रहणाची प्रक्रिया राबवून पर्यायी पाणी स्रोत उपलब्ध करून द्यावेत.

पाण्याच्या स्रोताच्या ठिकाणी फिल्टरची सुविधा उपलब्ध करून ग्रामीण नागरिकांना शुद्ध पाणी मिळेल, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

**पशुधनासाठी चाऱ्याचे नियोजन करा**

टंचाईच्या परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता हा महत्त्वाचा विषय असल्याने जिल्ह्यातील पशुधनाची गणना करून त्यानुसार उपलब्ध चाऱ्याचा आढावा घ्यावा. कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्त बैठक घेऊन चारा उपलब्धतेचे नियोजन करावे. भविष्यातील संभाव्य गरज लक्षात घेऊन आतापासूनच योग्य उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.



यावेळी हायड्रोपोनिक चारा निर्मितीसाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले. कमी जागेत आणि नियंत्रित पद्धतीने चारा उपलब्ध करून देण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे टंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध ठेवण्यास मदत होणार आहे.

**गेल्या तीन वर्षांच्या पीक पद्धतीचा अभ्यास करून पुढील आराखडा**

अल्प पावसाच्या पार्श्वभूमीवर आगामी काळातील शेतीचे नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांत झालेल्या पीक पद्धतीचा अभ्यास करून उपलब्ध पाणीसाठा, पर्जन्यमान आणि पिकांची पाण्याची गरज यांचा विचार करून पुढील पीक आराखडा निश्चित करावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्यानुसार योग्य पीक पद्धतीचा अवलंब करण्यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. टंचाईच्या काळात शेतकरी आणि पशुपालकांना आवश्यक मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने विभागांमध्ये समन्वय ठेवून सकारात्मक आणि परिणामकारक उपाययोजना कराव्यात, असेही डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

**नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांच्या हिताला प्राधान्य**

अल्प पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना कमीतकमी त्रास होईल, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध पातळ्यांवर नियोजन करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर, पाणीपुरवठा योजनांची पूर्तता, टँकर वितरणातील सुसूत्रता, शुद्ध पाण्याची उपलब्धता, पशुधनासाठी चारा आणि आगामी पीक नियोजन या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून टंचाई निवारणाचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

टंचाईची परिस्थिती गंभीर होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना हाती घेऊन नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, तसेच कोणतीही समस्या स्थानिक पातळीवर प्रलंबित राहू नये, यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

# निधी वाटपातील अन्यायाविरोधातील उपोषणाची प्रशासनाकडून दखल

## लेखी आश्वासनानंतर बापूशेठ धुमाळ व नऊ नगरसेवकांचे उपोषण स्थगित

**● श्रीगोंदा । वीरभूमी-** नगरपरिषद क्षेत्रातील विकासकामे व निधी वाटपात शिवसेना नगरसेवकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शिवसेनेचे गटनेते तथा नगरसेवक श्रीकृष्ण ऊर्फ बापूशेठ बबन धुमाळ यांच्यासह नऊ नगरसेवकांनी पुकारलेल्या उपोषणाची नगरपरिषद प्रशासनाने गंभीर दखल घेतली. विविध मागण्यांबाबत प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर शुक्रवारी (दि. ११) प्रस्तावित उपोषण स्थगित करण्यात आले.




सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान, नागरी दलितेतर निधी तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीचे सर्व प्रभागांना नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने वाटप करण्यात येईल, असे प्रशासनाने लेखी आश्वासन दिले आहे. तसेच शिवसेना नगरसेवकांसाठी नगरपरिषद कार्यालयात स्वतंत्र दालन येत्या आठ दिवसांत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित प्रभागातील नगरसेवकांच्या शिफारसी व मंजुरीचा विचार करून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले. या मागण्यांबाबत मुख्याधिकारी श्रीमती पुष्पगंधा भगत यांनी प्रशासनाच्या वतीने सकारात्मक कार्यवाहीचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण स्थगित करून प्रशासनास सहकार्य करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख मनोहर पोटे, तालुकाप्रमुख नंदकुमार ताडे, अक्षय काळे, नगरसेवक अनिल औटी, अख्तरभाई शेख, ऋषिकेश बोरुडे, दादासाहेब औटी, पांडुरंग पोटे आणि गणेश बोरुडे उपस्थित होते.

प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची ठरलेल्या कालावधीत अंमलबजावणी होणे अपेक्षित असून, त्यानंतरच या प्रश्नावर पुढील भूमिका ठरविली जाणार असल्याचे आंदोलनकर्त्यांकडून सांगण्यात आले.

# प्रभागाच्या सर्वांगिण विकासासाठी निधी द्या

## पाथर्डीत नगरसेवकांचे पालकमंत्र्यांना निवेदन । मुलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष

**● पाथर्डी । वीरभूमी-** पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ४, ५, ९ व १० मधील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधून या प्रभागांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नगरसेवक तथा गटनेते देवा पवार यांच्यासह नगरसेवक व नगरसेविकांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी पालकमंत्री विखे पाटील यांनी नवीन सुसज्ज प्रशासकीय इमारतीची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादीचे गटनेते देवा पवार, नगरसेविका मंगल पांडुरंग सोनटक्के, सविता चंदू भापकर, रेखा हंडाळ व अपक्ष नगरसेविका दिपाली रामनाथ बंग यांनी पालकमंत्र्यांना मागणीचे निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक ४, ५, ९ व १० मध्ये रस्ते, वीज व्यवस्था, आरोग्य सुविधा, पथदिवे, गटार व्यवस्था व स्वच्छतेसह नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रभागनिहाय विकासकामांना प्राधान्य देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

या प्रभागांतील खराब व अपूर्ण रस्त्यांचे डांबरीकरण अथवा काँक्रीटीकरण करावे, आवश्यक ठिकाणी नवीन पथदिवे बसवावेत तसेच विद्युत पोल व पथदिव्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने गटार व भूमिगत नाली व्यवस्था सुधारण्याबरोबरच स्वच्छतेकडेही विशेष लक्ष देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या विकासकामांसाठी नगरपरिषद, जिल्हा नियोजन समिती, राज्य शासनाच्या विविध योजना तसेच उपलब्ध इतर शासकीय निधीतून आवश्यक निधी मंजूर करावा, अशी विनंती करण्यात आली आहे. पालकमंत्र्यांनी या मागण्यांची सकारात्मक दखल घेऊन संबंधित विभागांना सूचना द्याव्यात आणि प्रभागातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या निवेदनावर नगरसेवक तथा गटनेते देवा पवार, नगरसेविका मंगल पांडुरंग सोनटक्के, सविता चंदू भापकर, रेखा हंडाळ व अपक्ष नगरसेविका दिपाली रामनाथ बंग यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डिंभा बोगदा स्थगिती हा अहिल्यानगरवर अन्याय

## स्थगिती उठविण्यासाठी पाणीवापर संस्थांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटणार : चंद्रकांत लामखडे

**● निघोज । वीरभूमी-** डिंभा बोगद्याच्या कामाला स्थगिती देणे हा अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी जनतेवर अन्याय आहे. ही स्थगिती उठविण्यासाठी पारनेर तालुक्यातील सर्व पाणीवापर संस्थांची बैठक घेऊन आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली पाणीवापर संस्थांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती शिखर पाणीवापर संस्थेचे प्रमुख पदाधिकारी चंद्रकांत लामखडे यांनी दिली.



लामखडे म्हणाले, पारनेर तालुका कायमस्वरूपी दुष्काळी असून कुकडी डावा कालवा तसेच पिंपळगाव जोगा धरणाचे पाणी मोजक्या २० ते २२ गावांनाच मिळत आहे. कर्जत, जामखेड व श्रीगोंदा तालुक्यातील बहुतांश जमीनही अद्याप पूर्णपणे सिंचनाखाली आलेली नाही. अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेला पाण्याचा समान हक्क मिळावा, यासाठी जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे डिंभा बोगद्याच्या कामाला मंजुरी व निधी मिळाला होता.

या बोगद्यामुळे दुष्काळी भागातील शेतीला पाणी मिळून उसाचे उत्पादन वाढेल, साखर उद्योगाला चालना मिळेल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि स्थानिक व्यवसायांना गती मिळेल. याचा फायदा शेतकरी तसेच सर्वसामान्य जनतेला होऊन शासनाच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकते, असे लामखडे यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांना पारनेर तालुक्यातील शेतकरी ऊस पुरवठा करतात. त्यामुळे या भागाला सिंचनाचे पाणी मिळाल्यास त्याचा लाभ दोन्ही जिल्ह्यांच्या अर्थव्यवस्थेला होणार आहे. केवळ एका जिल्ह्याचा विकास व्हावा आणि अहिल्यानगर जिल्हा कायम दुष्काळी राहावा, अशी भूमिका समाजाभिमुख विकासाला पूरक नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डिंभा बोगद्याचे काम झाले पाहिजे, ही अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेची मागणी आहे. त्यामुळे कामावरील स्थगिती तातडीने उठविण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्याची गरज आहे. याबाबत पारनेर तालुक्यातील सर्व पाणीवापर संस्थांची लवकरच बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात येईल. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे लामखडे यांनी सांगितले.

# लैंगिक अत्याचार प्रकरणातील फरार आरोपींच्या अटकेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पीडित कुटुंबीयांचे उपोषण

**● अहिल्यानगर । वीरभूमी-** अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील फरार आरोपींना तातडीने अटक करावी आणि तपासात निष्पक्षता आणावी, या मागणीसाठी अवधुत उत्तम गोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने अखेर लोकशाही मार्गाने हे पाऊल उचलावे लागल्याचे त्यांनी सांगितले.



सदर प्रकरणात पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे झाली असली तरी सुरुवातीपासूनच तपासात दिरंगाई होत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. तपासादरम्यान तपासी अंमलदारांची झालेली बदली आणि पुराव्यांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे तपासाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार बापूसाहेब आसाराम म्हस्के याच्यासह सहआरोपी शिंदे सर (रा. तुमसर, जि. भंडारा) तसेच अंबादास पुंडे याला जामीन मिळाली असून अनिल पिसे, किरण कराळे, पुरुषोत्तम आठरे व इतर आरोपी अद्याप मोकाट आहेत. आरोपी व त्यांचे नातेवाईक पीडित कुटुंबावर तक्रार मागे घेण्यासाठी राजकीय व इतर माध्यमातून दबाव आणत असून जीवे मारण्याच्या धमक्या देत असल्याचा गंभीर आरोपही उपोषणादरम्यान करण्यात आला असुन मुख्य मागणी आहे की, सर्व फरार आरोपींना तातडीने अटक करून कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. पीडितेचे सर्व वैद्यकीय अहवाल, डीएनए आणि फॉरेन्सिक पुरावे सुरक्षित ठेवून तपासात समाविष्ट करावेत.घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि कॉल रेकॉर्ड्सची सखोल चौकशी व्हावी. पीडित मुलगी व तिच्या कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण पुरवले जावे. मागण्या पूर्ण होईपर्यंत हे उपोषण असेच सुरू राहील, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.